आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

- राष्ट्रीय विज्ञान दिन विविध कार्यक्रमांनी साजरा, नागपूरच्या रमण विज्ञान केंद्रात विशेष कार्यक्रमाचे आयोजन.
- राज्यातल्या नागरिकांना राज्य सरकारच्या सुमारे ५०० सेवा व्हॉट्सअपद्वारे मिळणार.
- मुख्यमंत्री चषक अखिल भारतीय आमंत्रित कबड्डी स्पर्धेचे आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपुरात उदघाटन.
- वीजबिल ऑनलाइन भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्यासाठी महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू.

विज्ञान दिन

राष्ट्रीय विज्ञान दिन आज साजरा होत आहे. प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन यांनी 'रामन इफेक्ट'चा शोध लावल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. या अभूतपूर्व शोधासाठी सर रामन यांना १९३० मध्ये नोबेल परितोषिकांनं सन्मानित करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. विज्ञान आणि ज्ञान मिळून प्रत्येक समस्येचं निराकरण शक्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. नागरीकांनी विज्ञान आणि नवोन्मेषाला चालना द्यावी आणि विकसित भारताच्या निर्माणात विज्ञानाचा उपयोग करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. राष्ट्रिय विज्ञान दिन निमित्य ,नागपूरातील रामन विज्ञान केंद्र व तारामंडळ येथे विज्ञान आणि नवोन्मेषसाठी भारतीय तरुणांचे सक्षमीकरण या विषयावर एका प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आलं. प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्टुडन्ट नागपूरचे संचालक डॉ. विवेक नानोटी यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून या प्रदर्शनीचे उदघाटन करण्यात आले. नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन डी एस टी भारत सरकार आणि राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र सरकार यांच्या सहकार्याने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. स्टार्ट अप आणि ग्लोबल लीडरशिप मध्ये त्यांची भूमिका या विषयावर डॉ. नानोटी

यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. रामन विज्ञान केंद्र व तारामंडळ येथे 21 ते 28 फेब्रुवारी दरम्यान केंद्रात विविध उपक्रम अंतर्गत स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या ज्यात विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषक प्रदान करण्यात आले.

सामंजस्य करार

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या मेटा या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्सअॅप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या ५०० सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सअॅपवर मिळणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबई टेक वीक २०२५ या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते 'गव्हर्निंग द फ्युचर - एआय अँड पब्लिक पॉलिसी'या विषयावर बोलत होते. एनपीसीआय या जगातल्या सर्वात मोठ्या युपीआय पेमेंटगेटवे कंपनीचे जागतिक मुख्यालय मुंबईत सुरु केलं जाणार आहे. त्यासाठी आवश्यक जमीन कंपनीला हस्तांतरित केली जाणार असून त्याची कागदपत्रं आज कंपनीला सोपवण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. केंद्र सरकारनं नवीन फौजदारी दंड संहिता लागू केलीआहे. शक्ती कायद्यातल्या अनेक तरतुदी त्यात समाविष्ट आहेत. त्यामुळं शक्ती कायद्याचं स्वरुप बदलून नवीन आणावा लागणार असल्याचं ते म्हणाले.

*शक्ती कायदा जो आपण तयार केला होता तो अनेक कायदाचा अधिक्षेप करणारा कायदा होता आणि त्याच्यामध्ये मेजर जो केंद्रीय होम विभागाने त्या ठिकाणी काही ऑब्जेक्शन घेतले होते. त्यामध्ये सुप्रीम कोर्ट काय निर्णय होते ज्या निर्णयावरही तो अधिक्षेप करत होता त्यामुळे तो अधिकार राज्याला नाही म्हणून त्याच्यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता होती. तथापि त्यातले काही बदल करायचे आधी केंद्र सरकारने नवीन कायदे तयार केले आणि आपण शक्ती कायद्यामध्ये ज्या गोष्टी टाकल्या होत्या त्यातल्या बहुतांश गोष्टी या केंद्राच्या नवीन संहितेमध्ये त्या ठिकाणी कवर झालेले आहेत.म्हणून आता आम्ही याचा पुन्हा आढावा घेऊ आणि आवश्यकता असेल तर नवीन अमेंडमेंट सहित यासंदर्भातली पुढची कारवाई करू.*

**(RCONF) नागपूर**

भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या प्रादेशिक सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती केंद्र (**RCONF**) नागपूर यांनी भारताच्या पश्चिम आणि मध्य प्रदेशात सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी नुकतेच वनामती नागपूरच्या सभागृहात सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीवर दोन दिवसांचा राष्ट्रीय चर्चासत्र आणि प्रदर्शन आयोजित केले. या कार्यक्रमाचा उद्देश धोरणकर्ते, शेतकरी आणि एनजीओ आणि संघटना/उद्योजक आणि राज्यांमधील सेंद्रिय शेतीमध्ये सहभागी असलेल्या सर्व भागधारकांना **RCONF** नागपूरच्या अधिकारक्षेत्रात आणणे आहे. हे आयोजन यशस्वी झाल्याबाबदल आपले मनोगत व्यक्त केले आहे डॉ.अजयसिंग राजपूत यांनी....

*इसमें हमारे चीफ गेस्ट के रूप में एक बहुत ही इम्पोर्टेन्ट किसान भी हैं जो मनोज भाई सोलंकी तो उनको हमने मुख्य अतिथि बनाया था साथ साथ में हमारे जो पूर्व जॉइंट सेक्रेटरी हैं आदरणीय राणी कुमुदनी मैडम आई ए एस। उनको भी विशेष रूप से उन्होंने 2 दिन का समय दिया साथ साथ में एक हमारे पूर्व हाईकोर्ट जज जो अम्मादासी जोशी जो की मुंबई हाईकोर्ट के जज थे, उनका भी आगमन हुआ और वो प्राकृतिक खेती पर विशेष बढ़ावा दे रहे हैं। साथ साथ में बहुत ही इम्पोर्टेन्ट बात ये है कि तीन तीन पद्मश्री किसान शामिल रहे दोनों दिन। खासतौर पर जो हमारे यह भारत भूषण त्यागी बुलंदशहर से आए और उन्होंने खासतौर पर इस प्रोग्राम में बहुत ही अच्छी तरीके से किसानों को समझाइश दी। कैसे करना चाहिए और क्या तरीका हो सकता है, कैसे व्यवसाय खेती करें ।*

मुख्यमंत्री चषक

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने आणि लक्ष्यवेध फाऊंडेशनच्या सहकार्याने मुख्यमंत्री चषक अखिल भारतीय आमंत्रित कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ फेब्रुवारी, १ आणि २ मार्च २०२५ या कालावधीमध्ये स्व. रतन टाटा परिरसर लक्ष्यवेध मैदान नरेंद्र नगर येथे ही स्पर्धा पार पडेल. आज सायंकाळी ६ वाजता स्व.रतन टाटा परिरसर लक्षवेध मैदान नरेंद्र नगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होईल. उद्घाटन समारंभाला सुप्रसिद्ध अभिनेता स्वप्नील जोशी यांची उपस्थिती असणार आहे.

महास्वच्छता अभियान

डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने येत्या रविवारी 2 मार्च रोजी महाराष्ट्र भूषण डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून, संपूर्ण भारतभर महास्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. प्रतिष्ठानचे अप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे. नागपुरात 27 हजार चौरस मीटरवर ही स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार असून, आकाशवाणी नागपूरचे उपमहासंचालक रमेश घरडे यांची आकाशवाणी सिव्हिल लाईन्स परिसरातील मोहिमे दरम्यान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

हातमाग कापड स्पर्धा

राज्याच्या वस्त्रोद्योग विभागातर्फे अमरावती आणि नागपूर विभागातील हातमाग विणकर बांधवांसाठी विभागीय हातमाग कापड स्पर्धा घेण्यात येत असून, त्यासाठी ५ मार्चपर्यंत कापडाचे तयार नमुने सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्कृष्ट हातमाग कापड नमुन्यांना प्रोत्साहन देऊन विणकरांना गौरविण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात येते. नागपूरच्या वस्त्रोद्योग प्रादेशिक उपायुक्त कार्यालयातर्फे मार्च महिन्यात ही स्पर्धा होणार आहे. इच्छूकांनी ५ मार्चपर्यंत प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग, प्रशासकीय इमारत क्र. २, आठवा माळा, बी विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे तयार कापडाचे नमुने सादर करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

लकी डिजिटल ग्राहक

वीजबिल ऑनलाइन भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्यासाठी महावितरणने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. एक जानेवारी ते 31 मे 2025 या कालावधीत सलग तीन वा तीनपेक्षा अधिक वीजबिले ऑनलाइन भरणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉद्वारे स्मार्टफोन, स्मार्टवॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभघेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

अन्नपदार्थातील भेसळ

अन्नपदार्थातील भेसळ ओळखण्यासाठी राज्यात 28 मोबाईल लॅब देण्यात येणार आहे. यामुळे अन्नाचे नमुने, विश्लेषण अहवाल तातडीने मिळण्यास मदत होणार आहे. तसेच प्रयोगशाळेत प्रलंबित असलेल्या अन्न चाचणी विहित मर्यादेत करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले. झिरवाळ यांनी आज अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागांचा आढावा घेतला. दुग्धजन्य पदार्थ, मिठाईची निर्मिती आणि विक्रीची कसून तपासणी करावी. अन्न सुरक्षेसाठी अंगणवाडी सेविका, तसेच शाळेत स्वयंपाक करणाऱ्या महिलांना फोस्टॅक या अन्न सुरक्षा प्रशिक्षण आणि प्रमाणपत्राचे प्रशिक्षण देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

<u>नरहरी झिरवाळ</u>

अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ दोन दिवसीय विदर्भीय दौऱ्यावर असताना आज नागपुरात अन्न व औषध प्रशासन विभागाचे नूतन कार्यालयाचे सिव्हिल लाईन्स येथे पाहणी केली. या दरम्यान अन्न व औषध प्रशासन विभागाचे या नवीन इमारतीचे लोकार्पण येणाऱ्या एप्रिल महिन्यात निश्चित करण्याचा मानस असल्याचे प्रसार माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

<u>हवामान</u>

विदर्भात उन्हाची तीव्रता वाढत असून आज अकोला जिल्ह्यात 38 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. याशिवाय बुलढाणा इथं 36.5 चंद्रपूर आणि अमरावतीइथं 36.2 तर नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली,वाशिम, या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 35 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. सर्वात कमी किमान तापमान नागपूर इथं पंधरा पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतका नोंदवण्यात आलं.

******